# बाजीराव पेशवा (पहिला)

**पेशवे**



थोरले बाजीराव पेशवे

पहिले पेशवे बाळाजी विश्वनाथ भट्ट हे बाजीरावाचे पिता. वडिलांच्या सानिध्यात बाजीराव बरेच काही शिकला. शिपाई गडी करण्याची खुमखुमी त्याच्यात लहानपणापासूनच होती. म्हणूनच बाळाजी बाजीरावावर दिल्लीच्या बादशहाची भेट घ्यायला गेले तेव्हा अवघ्या १९ वर्षाचा बाजीही त्यांच्याबरोबर होता. उत्तर हिंदुस्थानात मराठी सत्तेला हातपाय पसरायच्या किती शक्यता आहे, याचा अदमास त्या कोवळ्या वयातच बाजीने घेतला होता. रणधुरंधर असलेल्या पहिल्या बाजीरावाने आपल्या कुशल युद्धनेतृत्वाने छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापलेल्या मराठा दौलतीच्या सीमा उत्तर भारतात विस्तारल्या. वेगवान हालचाल हा यांच्या युद्ध कौशल्याचा महत्त्वाचा भाग होता. यांनी केलेल्या सर्व मोठ्या लढाया जिंकल्या. बाळाजींच्या मृत्यूनंतर "पेशवेपदासाठी" दरबारी लोकांत अहमहिका लागली, त्यांत बाजीरावास परंपरागत पेशवेपद देऊ नये असे इतर दरबारी म्हणू लागले [ संदर्भ हवा ]. त्याला २ कारणे होती - १)यादवकालीन राजकारणापासून ते ताराराणीपर्यंत राजकारणावर देशस्थांचा पगडा होता ते वर्चस्व पुनः प्रस्थापित व्हावे असे देशस्थांना वाटणे स्वाभाविक होते. २) थोरले बाजीराव हा फटकळ होते, एक घाव दोन तुकडे हा त्यांचा स्वभाव होता.

मुत्सद्देगिरीपेक्षा त्याला समशेर जवळची होती. हे तरुण रक्त आपल्याला भारी पडणार हे लक्षात येताच शाहू महाराजांनी त्यांचा निर्णय बदलावा असे त्यांना

बाजीराव शिपाई होता. उण्यापुऱ्या ४० वर्षांच्या आयुष्यात त्याने अतुल पराक्रम गाजवला. १७२० मध्ये पेशवाई त्याच्या कोवळ्या खांद्यावर आली. त्याच्या मृत्यूपर्यंत म्हणजे २५ एप्रिल १७४०पर्यंत त्याने २० वर्षात अनेक लढाया केल्या. त्यात माळवा (डिसेंबर, १७२३), धार (१७२४), औरंगाबाद (१७२४), पालखेड (फेब्रुवारी, १७२८), अहमदाबाद (१७३१) उदयपूर (१७३६), फिरोजाबाद (१७३७), दिल्ली (१७३७), पेशावर (१७३७), कंदहार (१७३७), काबूल (१७३७), बलुचिस्तान (१७३७), तसेच भारतातील भोपाळ (१७३८), वसईची लढाई (१७ मे १७३९) या आणि अशाच ४७ मोठ्या लढायांचा समावेश आहे. आणि सगळ्याच लढाया तो जिंकला आहे. थोडक्यात त्याचा "सक्सेस रेट" "१००%" आहे. वेगवान हालचाल हेच त्याचे प्रभावी हत्यार. शत्रू सावध होण्याआधीच त्याच्यावर अशी काही झडप घालायची की त्याला सावरून प्रतिकार करायला वेळच मिळायला नको हीच त्याची रणनीती आपण "मैदानी लढाई" लढून जिंकू शकतो, हे मराठी सैन्याला जाणवून द्यायला कारणीभूत झाली.

इ. स. १७२३ आणि १७२४ मध्ये बाजीरावाच्या भेटींत त्याचा वरकरणी स्नेहपूर्वक गौरव करून तो कर्नाटकच्या स्वारीत गुंतला असता १७२६ मध्ये महाराष्ट्रात निजामाने शाहूच्या वाढत्या सत्तेला पोखरून काढण्यास सुरूवात केली. त्याने कोल्हापूरच्या संभाजीस हाताशी धरून मराठ्यांचा तोच खरा राजा आहे, असा दावा मांडला व संभाजीसह शाहूचा प्रदेश लुटण्यास सुरूवात केली (१७२७). या प्रसंगी छ. शाहूससुद्धा निजामाच्या या उपद्व्यापातून पडते घेतल्याशिवाय सुटका होणार नाही, असे वाटू लागले होते; पण बाजीराव कर्नाटक स्वारीहून महाराष्ट्रात येताच ही परिस्थिती पालटली. बाजीरावाने निजामाशी लढण्यासाठी व्यूहरचना करून निजामाच्या मराठवाड्यातील प्रदेशांवर हल्ले केले. तेव्हा निजामाने त्याचा पाठलाग सुरू केला. बाजीरावाने त्याला हुलकावण्या देत, खेळवीत पालखेड येथे अडविले. अशा अडचणीच्या जागी ( पालखेड ) सामोपचारांशिवाय सुटका होण्यासाठी दुसरा उपायच निजामाला उरला नाही. अशा रीतीने या इतिहास प्रसिद्ध पालखेडच्या लढाईत बाजीरावाच्या युद्ध कौशल्यामुळे निजाम नमला ( १७२८ ) तथापि त्याचे मराठेशाहीविरुद्ध प्रयत्न बंद पडले नाहीत. पालखेडची लढाई युद्धनेतृत्व व लष्करी हालचालींची चपलता आणि कौशल्य या दृष्टींनी महत्त्वाची मानली जाते. गुजरातेत सेनापती दाभाड्यांशी संघान जुळवून निजामाने त्याला छत्रपती व पेशवे यांच्या विरूद्ध प्रवृत्त केले; पण १७३१ मध्ये बाजीरावाने डभोई येथे दाभाड्यांचा पराभव करून निजामाच्या कारस्थानाची वाट लावली. त्यानंतरही आपले उद्योग न थांबवणाऱ्या निजामास बाजीरावाने भोपाळच्या युद्धात चांगलाच हात दाखविला. येथे बाजीरावापुढे हार खाऊन निजामाला दोराहसराईच्या तहान्वये स्वतःचा बचाव करून घ्यावा लागला ( १५ डिसेंबर १७३७ ). इ. स. १७४० च्या आरंभी निजामाचा मुलगा नासिरजंग याच्या मराठ्यांविरोधी चळवळी पाहून बाजीरावाने त्याला पराभूत करून त्याच्याकडून खरगो व हांडे ही दोन सरकारे मिळविली.

बुंदेलखंड मोहीम दिल्लीचा वजीर "मोहम्मद खान बंगेश" छत्रसाल बुंदेल्यावर चालून आला. तेव्हा त्याच्या समोर छत्रसालला शरणागती पत्करावी लागली. बंगेश हा औरंगजेबाच्या हाताखाली शिकलेला असल्याने शिस्त व चिकाटी हे गुण त्यात पुरेपूर उतरले होते. त्याने ८० वर्षांच्या छत्रसालला छावणीत बंदिस्त केले. मात्र छत्रसाल बुंदेला बंगेशचे बारसे जेवला होता, आपण शरण आलोय असे भासवून त्याने हेरांमार्फत बाजीरावाला एक पत्र पाठवले. कारण दिल्लीला ताळ्यावर आणेल असा तोच एकच परमप्रतापी पुरुष भारतात होता. "जग है उपजे ब्राह्मण, भृगु औ बाजीराव। उन ढाई रजपुतियां, इन ढाई तुरकाव ॥" - याचा अर्थ जगात २ ब्राह्मण नावाजले गेले. एक परशुराम ज्याने - उन्मत्त क्षत्रिय सत्ताधीशांना बुडविले, तर दुसरा बाजीराव पेशवा ज्याने तुर्कांची तीच स्थिती केली. याच पत्रात त्याने "जो गति ग्राह गजेंद्र की सो गति भई जानहु आज ॥ बाजी जात बुंदेल की राखो बाजी लाज ॥ असा "गजान्तमोक्षाचा" हवाला देऊन बाजीरावाकडे मदतीची याचना केली. पत्र मिळाल्यावर टाकोटाक ३५-४० हजारांची फ़ौज घेऊन खुद्द बाजीराव, मोहम्मद खान बंगेशवर चालून गेला. ही हालचाल इतकी त्वरेने केली की बाजीराव धडकेपर्यंत मोहम्मद खान बंगेशला काहीच समजले नाही.